# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

## प्रेसनोट क्र.७२५ दिनांक २८/०९/२०२०

## वालीव पोलीस ठाणे यांचेकडुन गावठी हातभट्टीची दारु तयार करणा-या आरोपीतावर कारवाई

दिनांक २६/०९/२०२० रोजी १७.३० वा.चे सुमारास वालीव पोलीस ठाणे हद्दीतील मालजीपाडा गावचे हद्दीत गावठी हातभट्टीची दारु तयार होत असल्याची गुप्त माहिति मिळाली होती. मिळालेल्या माहितीच्या आधारे सदर ठिकाणी छापा टाकला असता यातील आरोपीत क्र.१ तुषार महेश पाटील व आरोपीत क्र.२ हेंमत जनार्दन पाटिल यांनी हातभट्टीची दारु तयार करण्याचे द्रव्ये व सामग्री असा प्रोव्हिबिशन गुन्हयाचा माल बाळगुन गावठी हातभट्टीची दारु तयार करीत असताना त्यास पोलीसांची चाहुल लागताच पळुन गेला. आरोपीत याचे ताब्यातुन १) १,१५,२००/-एकुण ४८ प्लास्टीक ड्रम २०० लिटर क्षमतेचे् प्रत्येक ड्रमध्ये अदाजे २०० लिटर नवसागर मीश्रीत तयार गुळाचा वॉश गावठी हातभट्टीची दारु तयार करण्याचे उपयोगाचे एकुण ९६०० लिटर वॉश २)६००/- एकुण १ लाकडी चाटु त्यास लोखंडी व प्लास्टीक नळी ३)७,०००/-ॲल्युमीनीअमच्या धातुचे मोठया आकारचे १ सतेले जुने व लोखंडी भांडे ४)३०००/-एक प्लास्टीकचा कॅन त्यामध्ये १० लिटर गावठी हातभटीची दारु व दोन ४० लिटर क्षमतेचे रबरी टायरच्या टयुब एकुण ९० लिटर गावठी हातभटटी दारु ५)६०००/-हातभटटी पेटवण्यासाठी लागणारे लाकुड ६)२१,०००/-२१ प्लॅस्टिकचे रिकामे २०० लिटर क्षमतेचे ड्रम प्रत्येकी १०० रु किंमतीचे असा एकुण १,३३,९००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीत याचे विरुध्द वालीव पोलीस ठाणे गु.र.नं. ।।। ७६७/२०२० महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(क) (ड) (फ) (इ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास करित आहेत.

सदरची कारवाई पोलीस निरीक्षक श्री.विलास चौगुले, प्रभारी अधिकारी वालीव पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली वालीव ठाणेचे पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी यांनी केली आहे.